---

## सुधाताई, सुस्वागतम्

प्रिय नलिनी,

तुला खूप खूप आनंदाची बातमी कळविण्यासाठी हे पत्र मुद्दाम लिहायला घेतलं आहे.

नलिनी, अखेर ज्या सुवर्णमय, अत्युत्कट आनंदाच्या सुगंधी क्षणाची सारं राष्ट्र अहोरात्र वाट पहात होतं, तो क्षण उगवला. परदेशाला जाताना तुझी प्रिय सुधामावशी तुला भेटू शकली नव्हती, अन् त्यामुळंच तुझं पाऊल पुनःपुन्हा मागं रेंगाळत होतं ना, ती पोर्तुगीजांच्या त्या क्लेशदायक बंदिवासांतून अखेर मुक्त झाली. महादेवशास्त्र्यांच्या गृहलक्ष्मीनं आपल्या सोनेरी पावलांनी गृहप्रवेश करुन केवळ आपलं स्वतःचंच घर नव्हे तर भोवतालचा सारा परिसरच उजळून टाकला. यदु-अशोकाला कितीतरी दिवसांनी त्यांची आवडती आई पोटभर भेटायला मिळाली, सुधाताईंच्या वृध्द सासूबाईंना घराची खरी 'मालकीण' आल्यानं सारी सूत्रं तिच्या हाती परत सोपविता आली. जावईबुवा तर खुशीतच! कारण इतक्या वर्षांचा त्यांचा दिवाळसण आता सासूबाई मोठ्या कोडकौतुकानं साजरा करणार व शास्त्रीबुवा आणि त्यांची लेक अर्थातच नव्या जावईबापूंची पाठराखणी करणार - त्यामुळं वातावरणात सर्वत्र 'आनंदी आनंद गडे' असे स्वर घुमताहेत.

१८ मे ला तुझा वाढदिवस असतो नाही? नेमकी त्याच दिवशी सुधाताईंच्या मुक्ततेची अमृतमधुर वार्ता कानी आली अन् साऱ्या राष्ट्राचे कान अन् मन अगदी तृप्त होऊन गेलं. गोव्यात दोन दिवस राहून आपली सर्व कुटुंबीय मंडळी व इतर सुहृदगण यांना भेटून सुधाताई २४ मे ला इथं पुण्याला येणार असं वृत्तपत्रांतून कळलं. सुधाताई यायच्या त्या दिवशी सदर्न रेल्वेची गाडी चांगली तब्बल तासभर लेट! दुपारी तीन साडेतीनची वेळ. ऊन म्हणजे कोण रणरणलेलं, ऐन वैशाखातलंच ते! पण कुणाच्या ते गावीही नव्हतं. साऱ्या मराठी, इंग्रजी वृत्तपत्रांच्या, त्यांच्या बातमीदारांच्या, भाजीवाल्यांच्या, दुकानदारांच्या, लहान मोठ्या तरुण स्त्रीपुरुषांच्या, टांगेवाले, रिक्षावाले या साऱ्यांच्या, साऱ्या महाराष्ट्रभर किंबहुना भारतभर प्रत्येकाच्या तोंडी एकच विषय, एकच विचार - 'अहो, आपल्या त्या सुधाताई जोशी गोव्याच्या तुरुंगातून सुटल्या, अन् त्याही अगदी बिनशर्त सुटल्या म्हणे!'

त्या दिवशी पुण्याच्या स्टेशनवर शेकडो माणसं-लहानमोठी, काळी-गोरी, देशभक्त-अभक्त, विद्वान-अपंडित, कलावंत-साहित्यिक या साऱ्यांची नुसती झुंबड लोटलेली! गाडी कधी येते अन् सुधाताईंना सर्वांच्या आधी आपण पाहतो कधी, अन् आपला हार त्यांच्या गळ्यात सर्वात प्रथम घालतो कधी यासाठी प्रत्येकजण उत्सुक झालेला. माना उंचावून फलाटाच्या बाकड्यावर उभे राहून जितक्या दूरवर दृष्टी पोचेल तितकी नजर वळवून लोक हर्षोत्फुल्ल मुखानं बघत होते. स्टेशनवर हरज असलेलं महिलामंडळ त्यांची तर आज विशेष आनंदाची घटिका होती. बहुतेकजणी पांढऱ्या शुभ्र खादीची किंवा साधी पातळं नेसून गोव्याच्या त्या रणरागिणीचं स्वागत करायला, त्यांच्या निर्भय शूर सेनानीला सन्मानपूर्वक अभिवादन करायला केव्हाच्या सिध्द होऊन राहिल्या होत्या. ज्याला त्याला, जिला तिला वाटत होतं - आज माझ्या घरचंच माणूस दीर्घकाळाच्या तापद कारावासातून घरी येणार.

शेवटी एकदाची गाडी आली आणि सुधाताई सर्वांच्या दृष्टीपथात आल्या. तीच त्यांची हेमकांती, सतेज टवटवीत, घवघवीत, चित्पावनाचा गौरवर्ण, त्यावर हिरवट-पारवट रंगाचं चौकड्याचं नऊवारी लांबरुंद पातळ नेसलेल्या. हातमागाच्या खणाची साधी चोळी त्यांनी अंगात घातलेली. हातात काचेची डाळिंबी रंगाची एकेक बांगडी. कपाळावर मद्रासी जांभळट रंगाचं कुंकू सुमारे आधेलीच्या आकाराचं, अन् अगदी गोऽल. त्याच्याखाली हिरव्या गोंदणाचा चिमुकला एक ठिपका, अन् गोऱ्यापान गळ्यावर रुळणारं ठसठशीत, टपोऱ्या मण्यांचं मंगळसूत्र. या साऱ्यावर त्यांच्या चेहऱ्यावरील नम्र परंतु प्रसन्न हास्यानं खरोखरी कळस चढविलेला. पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रथम चिमुकला यदु आणि नंतर त्या सावकाशीनं उतरल्या. त्यांना पाहून खऱ्याखुऱ्या तेजस्वी, मानधन, झुंजार सेनानीच्या दर्शनाचा आनंद सर्वांना वाटला. त्या उतरताच उपस्थितांच्या मुखांनी एकच उत्स्फूर्त जयघोष केला, "सुधाताई जोशी की जय" "आझाद गोवा जिंदाबाद", "भारत-गोवा एक है", "सुधाताईंचा विजय असो". स्टेशनचं वातावरण त्या जयघोषानं दुमदुमून गेलं.

हारतुऱ्यांचा अक्षरशः पाऊस त्यांच्यावर पडला. जगतीतलावर जिथं तिथं हिंदी माणूस आहे. स्वातंत्र्येच्छु हिंदी मन आहे ते ते म्हणत होतं "सुधाताई, सुस्वागतम्! सुधाताई, भले शाबास! तुम्हाला आमचे शतशः प्रणिपात."

गांधीजी म्हणत, "महाराष्ट्र हे कार्यकर्त्यांचं मोहोळ आहे." त्या वचनांची यथार्थता मला त्या क्षणी फार तीव्रतेनं प्रत्ययाला आली. सुधाताई-शास्त्रीबुवा सारीच मंडळी जनतेनं केलेल्या त्या प्रचंड सत्कारानं अगदी भारावून गेली. त्या अफाट जनसागरातून वाट काढीत ती दोघं व त्यांच्याबरोबरची काही इतर पुढारी मंडळी प्रथम केसरी कचेरीत लोकमान्यांच्या पुतळ्याला हार घालण्यासाठी निघाली. तेव्हा माझ्या मनात आलं, लोकमान्यांचा, आगरकरांचा, गोखले-रानड्यांचा, हरिभाऊ-ज्योतिबांचा या व अशा थोर माननीय व्यक्तींचे आत्मे नेहमी पुण्याभोवती वावरत असतील का? सुधाताईंसारख्यांवर अशा प्रसंगी तेही आपापल्यापरी अभिनंदनाची पुष्पं उधळीत असतील का? लोकमान्यांच्या पुतळ्याला त्यांनी हार घातल्यावर त्या पुतळ्याचे डोळेही क्षणभर कौतुकानं पाणावणार नाहीत काय? या दोन निर्भय व धीरोदात्त लढवय्यांच्या डोळ्यांची ती मूकभेट केवढी हृदयस्पर्शी! केवढी भव्योदात! जेवढी स्फूर्तिदायक व गंभीर तेवढीच करुण ठरली नसेल काय?-

गेला आठवडाभर सुधाताईंवर साऱ्या भारतवर्षातून तारा, पत्रं, फोन, भेटी यांचा वर्षाव चालला आहे. महामंत्री जवाहरलालजींनी अतिशय तत्परतेनं अभिनंदनाचं छोटसंच पण मोठं गोड पत्र पाठवून पाठ थोपटली आहे त्यांची. "अखेर तुमची पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी सुटका केली याचा मला आनंद झाला. गोव्यात तुम्हाला ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या व तेथील तुरुंगात तुम्हाला खितपत पडावे लागले याचे आम्हां सर्वांना अतिशय दुःख झाले आहे. तुमची प्रकृति आता ठीक होवो." असं त्यांनी लिहिलंय.

ज्याच्या एका शब्दासाठी आपले प्राण देशाच्या कार्यासाठी केव्हाही अर्पण करावे असं भारतीयाला वाटावं अशा या भारत-भाग्यविधात्यानं लिहिलेलं हे पत्र वाचून जन्माला आल्याचं सार्थक झाल्याचा आनंद कोणालाही वाटल्यावाचून राहणार नाही. "गुणी गुणं वेत्ति" याचं हे हृदयंगम दर्शन आहे नाही? नेहरुंप्रमाणंच प्रांताप्रांताचे मुख्यमंत्री, प्रसिध्द सहित्यिक, कलावंत साऱ्यासाऱ्यांनी आपला आनंद व्यक्त केला. आम्ही पुण्यांतील नागरिक मंडळी तर गेला आठवडाभर दिवाळी-दसराच साजरा करतो आहे म्हणेनास. ज्याच्या त्याच्या मुखी एकच घोष - 'शाब्बास सुधाताई!'

२४ तारखेस मी त्यांना स्टेशनवर भेटले, भेटले कसची? त्यांना पोट भरुन पाहून घेतलं. पण मनमुराद गप्पागोष्टींची भूक अजून कुठं भागली होती? म्हणून दुसऱ्या दिवशी सकाळीच पुन्हा त्यांच्याकडे गेले. शनिवारातलं मेहुणपुऱ्यातलं त्यांचं ते चार खोल्यांचं चिमुकलं घर त्यावेळी माणसांनी नुसतं फुलून गेलं होतं. सर्व तऱ्हेच्या, विविध जातींच्या, धर्माच्या, राजकीय व सामाजिक पक्षांच्या स्त्री-पुरुषांची त्यांच्या भेटीसाठी, तर काही मंडळींची अक्षरशः त्यांच्या दर्शनासाठी ही रीघ लागलेली! मी गेले अन् कडकडून मिठीच मारली बाई त्यांना! तोंडातून शब्द फुटेना माझ्या बोलायला! सुधाताईंच्या चेहऱ्यावर त्यावेळी तेच प्रसन्न हास्य, तोच वृत्तीचा ताजेपणा, टपोऱ्या उमललेल्या अन् दवबिंदूंनी सचैल स्नान घातलेल्या मोगऱ्याच्या फुलासारखा! त्यांच्या मूक स्वागतानं मी दिङमूढच झाले.

त्या दिवशी महादेवशास्त्र्यांनी नवीन परीटघडीचं धोतर परिधान केलं होतं. त्यांची कन्यका 'ताई' आपल्या छबकड्या स्वातीला घेऊन 'मावशी' , 'मावशी' करत खालीवर करीत होती. चिमुरड्या दहा वर्षाच्या यदुची तर ऐट विचारुच नका, आदल्या दिवशी शनिवारवाड्यापुढे सुधाताईंच्या स्वागताची प्रचंड सभा झाली होती. एस्.एम.नानासाहेब व सुमतीबाई गोरे, जयवंतराव टिळक इत्यादि पुढाऱ्यांनी भाषण करुन सुधाताईंचं स्वागत केलं होतं. त्यात या बालवक्त्यानं "आमची आई आता मोठी झाली म्हणून मला फार फार अभिमान वाटतो. तुरुंगात जाण्यापूर्वी तिला ए बी सी डी ही येत नव्हतं; आता तर ती आम्हाला पत्र लिहिते म्हटलं इंग्रजीत!" असं उत्स्फूर्त व झोकदार भाषण करुन नाव मिळवलं होतं पण आज मात्र वक्तेमहाशय आईच्या मागं मागं हिंडत होते. आपली आई पटदिशी पुनः आपल्याला कुठं सोडून जाणार नाही ना म्हणून जणू काही डोळ्यांचा पहाराच ठेवून बसले होते तिच्यावर.

सुधाताईंच्या सासूबाई म्हणत होत्या, "सुनबाई, रात्रीची जेवली नाहीयस हो तू. आता हे फणसाचे चार गरे तरी टाक तोंडात अन् हो थोडी आडवी." त्यांच्या स्वरातलं ते गाढ वात्सल्य पाहून मला गहिवर आला. ही ऐंशी वर्षांची माऊली गेली चार वर्षे सुधाताईंच्या स्वयंपाकघराच्या व इतर सर्व गृहव्यवस्थेची 'इन-चार्ज' होती. फार श्रम झाले की दमून जाऊन, क्वचित ती अंग टाकून पडे. पोराबाळांच्या दंग्यागलक्यानं शिणून जाई, कधी स्वतःवर किंवा स्वतःच्या पोरांवर थोडी कातावतही असे, पण बिचारीन तोंडानं सुनेबद्दल अवाक्षर काढलं की नाही कुरबुर करीत म्हटलं, "कशाला गेली माझ्या गळ्यांत चूल बांधून नसते उपद्व्याप करायला गोव्याला!" असं प्रेम करणारी माणसं लाभणं याहून आगळं काय सौख्य हवं असतं ग संसारात माणसाला?

अन् शास्त्रीबुवा? छे! नलिनी, त्यांच्या भावनांच्या कल्लोळाचं चित्र नाही मला यथार्थपणे रंगवता येत. या साऱ्या प्रेमाच्या वर्षावानं सुधाताई अगदी एखाद्या नववधूसारख्या लाजून गेल्या होत्या. सुधाताईंची वृत्ती पहिल्यापासूनच मोठी लाघवी, लोकसंग्राहक अन् समाजप्रिय. त्यामुळं मी गेले तेव्हा भोवती समवयस्क मैत्रिणींचं तसंच प्रौढ स्त्रियांचं हे भलं मोठं कोंडाळं जमलेलं. सर्वांनी प्रश्नांचा एकच भडिमार चालवलेला. कोणी विचारी, "काय सुधाताई, आता बरं आहे ना?" अतिशय आर्जवी भाषेत सुधाताई उत्तर देत, "काकू, तुमच्या आशीर्वादानं सारं कुशल आहे हो."

कोणी पुरंध्री विचारपूस करी, "डोळे फार बिघडले म्हणे तिथल्या वास्तव्यानं तुमचे, आता चांगलं औषध करा बाई, आमच्या शेजारच्या वाड्यात ते वैद्य रहातात ना?...." कोणी आपल्याशीच पुटपुटायची - "अंधार कोठडीतच मेल्यांनी कोंडलं सुधाताईंना, तर काय हो व्हायचं दुसरं? तळपट होवो त्या मेल्या पोर्तुगिजांचं!" असे शिव्याशापही ती उच्चारी.

सुधाताई हे सारं ऐकत होत्या - संथपणे, शांतपणे, तर क्वचित् काही त्या विषयी बोलत होत्या. येणाऱ्या जाणाऱ्या सर्वांचं प्रसन्न मुद्रेनं स्वागत करण्यात ते दांपत्य अगदी गढून गेलं होतं. शास्त्रीबुवा सर्वांच्या हाती पेढा ठेवत व म्हणत, "आमची सुधा - माझी, आपली सर्वांची सुधा सुखरुपपणे घरी आली ना, म्हणून हो हे पेढे. तुमच्या साऱ्यांच्या स्वागताला आमचं घर अपुरं पडतंय आज. पण सारं गोड करुन घ्या हं" त्यांचं हे प्रेमळ वचन कानी आलं की ऐकणाऱ्याच्याही मनांत विलक्षण कालवाकालव होऊन जाई. या साऱ्या धमाल गर्दीतच कोणी अनोळखी बंधू येत "ताई, ही आमची गरीबाची भेट घ्या. तुमच्या दर्शनासाठी केवळ आलो खानदेशांतून" - असं सांगून सवाष्णीचं वाण म्हणून खणानारळांनी ओटीही भरत. ती सारीच दृश्यं अंतःकरणाला भिडणारी होती.

सुधाताईंना जरा निवांत वेळ सापडताच मी विचारलं, "स्त्रिया म्हणून काही विशेष वा वेगळा त्रास दिला का तुम्हांला पोर्तुगीज पोलिसांनी?" त्यावर त्या म्हणाल्या, "तसं फ़ारसं कधीच झालं नाही हं. आम्हांला म्हापशाला पकडून कस्टडीत टाकलं ना रात्री १२ वाजता, तेव्हाच रात्रभर त्या पोलिसांनी खूप शिवीगाळ केली. दणकेही घातले थोडे. पण पुन्हा नाही हं कधी तसे वागले ते. त्या दिवशीची गोष्टच निराळी होती. सारं वातावरणच प्रशुब्ध झालेलं होतं. शिपाईही खूप गरमागरम झालेले व प्यायलेले. तेव्हा तेवढं चालायचंच. बोलून चालून तुरुंगच, तोही शत्रूंचा ना तो? पण म्हणून उगाच शत्रुपक्षाबद्दल खोटीनाटी माहिती सांगून त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणं मला मुळीच योग्य वाटत नाही. शिवाय त्या शिव्यागाळीबद्दल सत्याग्रह करुन आम्ही जाब विचारलाच की. सिंधूताईंनी व मी उपोषण आरंभलं ते पाहून काही दिवसांनी अधिकारी विनवून म्हणाले, तुम्ही कृपा करुन हे थांबवा, आम्ही चौकशी करतो साऱ्यांची. तेव्हा उगाचच अधिक ताणणं बरं नव्हे असं वाटून आम्ही स्वस्थ राहिलो." एखाद्या मुत्सद्दी, व्यवहारचतुर नेत्याला शोभणाऱ्या भाषेत हसत हसत सुधाताई म्हणाल्या.

म्हापशाहून पणजीला आणताना रात्री वाटेत मोटारीत पोलिसांनी तुमचा नेता कोण ते सांगा, नेत्याचं नाव सांगा असा एकच गिल्ला केला. बरोबरीचे तरुण विद्यार्थी, स्वयंसेवक व विद्यार्थिनी आणि वृध्द श्री. अंबिकाबाई दांडेकर इत्यादी सर्वच सहकारी मंडळी ताईंना अधिक त्रास होऊ नये म्हणून नेत्याचं नाव सांगेनात तेव्हा-

"मी आहे हो त्यांची पुढारी, काय हवं आहे तुम्हाला? सांगा न मला" असं निर्भयपणे त्यांनी विचारलं. सुधाताई या व अशाच प्रकारच्या अनेक रोमांचकारी हकिकती यावेळी सांगत होत्या. मधूनच हसतही होत्या. पण त्यावेळी ज्या बाणेदारपणानं व दृढ निर्धारानं त्यांनी ही उत्तरं परकी सत्तेला दिली त्या विविध गुणांचं प्रतिबिंब आताही त्यांच्या गौरमुखावर स्पष्ट उमटलं होतं. ते पाहून या सुशीला व तेजस्वी स्त्रीबद्दल माझं मन निरतिशय आदरानं भरुन आलं.

"एकूण चार वर्ष एक महिना तुम्ही पोर्तुगीज सरकारचा पाहुणचार घेतलात तर! पण केलंत काय तिथं? वेळ बरा गेला का हो? ना कोणी मायेचं की प्रेमाचं माणूस जवळ. दुखलंखुपलं तर औषधपाणी तरी मिळायचं का वेळेवर? यदु-अशोकाच्या ओढीनं, त्यांच्या वडिलांच्या काळजीनं जीव तीळतीळ तुटत असेल नाही नेहमी आठवणी येऊन?" मी जरा अधिकच नाजूक प्रश्न विचारला होता. त्यावर त्या शांतपणे म्हणाल्या, "हे लिहित पुष्कळदा "मुलांना पाठवून देतो" म्हणून पण मीच म्हणायची, मुलांना पाठवू नका, इतके श्रम करुन त्यांनी येऊन भेट व्हायची अर्धा तास. मी इतकी आसुसलेली नाही. मुलांचे फोटो मजजवळ आहेत त्यावर होतं समाधान माझं. मुलं मोठी झाली म्हणजे ती थोडीच सर्वकाळ राहणार माझ्याजवळ?"

सुधाताईंचा हा संयम पाहून मी थक्कच झाले. ज्यांनी देशभक्तीचं असिधाराव्रत घेतलेलं असतं त्यांचा संयम असाच असायचा. "जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे। बुद्ध्याचि वाण करि हे धरिले सतीचे" हे ज्याचं ब्रीद अशा ध्येयवादी लोकांना आम्ही सामान्यांनी काय सांगायचं?

- 'आणि वेळेबद्दल म्हणाल तर तो गेला कसा अन् कधी तेच बाई मला कळलं नाही. पहिला एक वर्ष एक महिना 'पिंजऱ्यात' (कस्टडी) काढला. सूर्यप्रकाशाची तिथं फार महागाई. तेव्हा अहोरात्र दिवा लावून बसावं लागे. अगदी चिमुकल्या खोलीत चारचार सहासहा माणसं प्रसंगी कोंबलेली असायची. तुरुंगावरचे पोलीस ठराविक आन्हिकं व विधीसाठी ठराविक वेळी दरवाजे उघडत पिंजऱ्याचे. जेवण मात्र ठीक असे हं. गोव्यातल्या माधवाश्रमाच्या चालकांनी आमच्या जेवणाची व्यवस्था आपल्याकडे घेतली होती. ते चालक खरोखरीच भले, कारण दोन पैसे दर कमी करुन, झीज सोसून ते आम्हांला चांगलं जेवण देत.'

या व अशा अनेकविध आठवणी सांगत असताना ज्या फातरफेकर नांवाच्या म्हातारीच्या घरी सुधाताई एक रात्र गुप्ततेनं राहिल्या, ती व तिच्या सारख्याच अनेक गरीब-तरुण-वृध्द इत्यादी सर्व मदतनीसांबद्दल पुनःपुन्हा आदराचे व कृतज्ञतेचे उद्गार काढीत होत्या. त्यांची ही उदार, सरलमनस्क व खऱ्याखुऱ्या लोकनेत्याला शोभणारी वृत्ती आजच्या नवशा, गवशा व हौशा आणि (तथाकथित) विद्वान व लोकप्रिय(!) पुढाऱ्यात किती कमालीची दुर्मिळ आहे हा विरोध मला अतिशय जाणवला व मन विषण्ण होऊन गेलं माझं, नलिनी.

एवढ्यात आदल्या दिवशीच्या शनिवारवाड्यापुढील सभेला हजर असलेली एक विदुषी म्हणाली, "काल तुम्ही अगदीच छोटसं भाषण का केलंत? आम्हाला वाटलं खूप खूप सांगाल तुम्ही हकीकती व डिस्कस कराल सरकारची पॉलिसी वगैरे" त्यावर त्यांनी झटकन उत्तर दिलं, "अहो, तुम्ही साऱ्या लोकांनी उगाचच माझा सत्कार अन् गौरव चालवला आहे. त्या साऱ्यांच्या दडपणानं, खरं सांगू का, माझा जीव अगदी संकोचून जातो. मी केलं आहे काय असं मोठं कार्य? माझ्या शतपट मोठं कार्य तुरुंगात दीर्घकाळ खितपत पडलेली मंडळी करीत आहेत. माझ्या तरुण सहकारी कन्यका जीवनातल्या सर्व सुखावर आपल्या हातांनी पाणी सोडून देशसेवेसाठी उग्र कारावास सोसताहेत. त्यांची खरी पूजा व्हायला हवी. तिथं खरं म्हटलं तर साऱ्यांचं मस्तक नम्र व्हायला हवं. मी कसली साधी प्रापंचिक गृहिणी! चुलीपुढून उठले ती गेले गोवा नॅशनल कॉंग्रेसच्या अध्यक्षाच्या खूर्चीवर. चार दोन वाक्यं बोलले न बोलले तर बनले राजबंदी अन् गेले कैदेत पुढारी म्हणून. तिथंच मेले असते तर हुतात्माही केलं असतं जगानं मला. पण खरं खरंच मला या साऱ्यांचं ओझं वाटतं हो.

"'दोडामार्गानं अंधारात गुप्त रीतीनं मार्ग कापीत आम्ही वाटचाल करीत असताना एका म्हाताऱ्या बाईच्या घरी वस्तीला राहिलो हं, कासार जातीची होती ती! पुनःपुन्हा मला ती म्हणे, "माझ्या धर्माच्या लेकी, बाई गं, संभाळून जा हो. माझी सून गर्भारशी

आहे म्हणून मी इथं घरांत अडकून पडले आहे गं, नाहीतर मीही आले असते ,पोरी तुझ्या संगात." आपल्या घरांत टिळक-गांधी-नेहरु-सुभाषचंद्रादींचे फोटो तिनं मोठया भक्तिभावानं लावले होते, अन् गोव्यातून मुक्तता झाल्यावर मी तिला भेटायला गेले होते ना, तेव्हा तस्सेच लटकवले होते ते तिथंच.'हे असेच ठेवणा' असं ती म्हणाली. ही खरी अविचल श्रध्दा, देशभक्ती. यांचा खरा सत्कार व्हायला हवा. पण तो कोणी करतं आहे का?"

हे सांगताना सुधाताईंचा इतका वेळ खंबीर असलेला स्वर ओलावला. मुलाबाळांची आई, पतीची पत्नी असलेली ही एक मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय महिला गोव्याच्या तुरुंगातल्या हालअपेष्टांनी चुकूनसुध्दा कधी खचली नाही, ध्येयापासून च्यूत झाली नाही क्षणभरसुध्दा. एखाद्या पर्वतासारखी स्थिर अन् दृढ उभी राहिली चार वर्ष सारं सोसत. पण नलिनी, आपल्यापेक्षा तरुण वयाच्या कन्यका मात्र तुरुंगात तिकडे यातना भोगीत पडल्या आहेत याच्या आठवणींनी बेळगावात पाऊल टाकतांच या थोर स्त्रीला रडं आवरेना! सारंच अपूर्व अन् विलक्षण आहे! या त्यांच्या साऱ्याच वागण्यात जी कमालीची अकृत्रिमता, ऋजुता व प्रसिध्दिपराङमुखता आहे ना, ती पाहिली की मानसन्मानाच्या मागं लागून राजकारणाचे फासे टाकणाऱ्या सध्याच्या युगातील समाजकार्य व राजकारण करणाऱ्या बोलघेवड्या, पोषाखी अन् दिखाऊ स्त्रियांची मला घृणा आल्यावाचून रहात नाही.

सुधाताई बोलण्याच्या आवेगात आल्या होत्या. मनांत कोंडलेलं सारं हृदगत एकदा सांगून रितं व्हावं असं त्यांना वाटत होतं. कसल्याही प्रकारची दांभिकता त्यांना असह्य होत असावी असं त्यांच्या स्वरांतील चढउतारांवरुन भासत होतं.
'मी कसला स्वार्थत्याग केला आहे? उलट मी कमी जबाबदारीचा मार्ग पत्करला. मुलांचे वडीलच आधी जाणार होते सत्याग्रहाला. पण त्यांची तब्येत ही अशी नादुरुस्त. मी अशिक्षित. त्यांच्या गैरहजेरीत मुलांचा प्रपंच कसा चालविला असता? आणि कोणत्याही परिस्थितीत प्रपंचासाठी मी व माझी मुलं यांनी कोणापुढं भिक्षा मागितलेली मला कधीही चालली नसती. तेव्हा मीच यांना म्हटलं, "गोवा आपली जन्मभूमी आहे. घरटी एक माणूस तिच्या मुक्तेसाठी जायला हवं ना? तुम्ही अन् मी काय दोन आहोत, अं? सांगा ना. तेव्हा मीच जाते, नाही तरी तुम्ही म्हणतां ना विनोदानं, तुझं हृदय पित्याचं आहे म्हणून! मग मातेची जबाबदारी तुमच्या अंगावर टाकून जाताना, तुम्ही परवानगी द्यायलाच हवी मला, खरं की नाही?" अन् निघाले एक दिवस!"

नलिनी, सुधाताईंचे हे विचार ऐकताना त्यांच्यातील जाज्वल्य पतिव्रता, कर्तव्यदक्ष पत्नी व स्वाभिमानी स्त्री या साऱ्या माझ्या मनःश्चक्षुंपुढं उभ्या राहिल्या. अन् मग पंडितजींनी लोकसभेत दिलेलं निवेदन मला आठवलं. एका सभासदानं प्रश्न विचारला होता की, "सुधाताई जोशींच्या कुटुंबीयांसाठी सरकार काय खर्च करीत आहे?" त्यावर पंडितजींनी उत्तर दिलं, "सरकार त्यांना अवश्य मदत करील परंतु तसा याचनेचा अर्जच त्यांच्याकडून आलेला नाही." हे आगळं तेज सतीचंच आहे, नव्हे का?

म्हापशाला गोवा नॅशनल कॉंग्रेसची सभा भरायची होती ना, त्यावेळी लपत छपत, गुप्तरीतीनं त्या सभेच्या स्थानापर्यंत गेल्या. ज्या दिवशी संध्याकाळी सभा व्हायची त्या दिवशी सबंध दुपार त्यांनी बोंदलेश्वरच्या देवळात देवाला गाऱ्हाणं घालण्यात घालवली. पुजाऱ्याला वा आसपासच्या कोणा मंडळींना शंकाही येऊ नये आपण कोणत्या कामासाठी आलो त्याची म्हणून आपल्या बरोबरच्या स्वयंसेवकाला त्यांनी भाचा बनविलं अन् "देवा या माझ्या भाच्याचं लगीन लवकर होऊ दे, त्याला चांगली गोरीगोमटी बायको मिळू दे अन् त्याच्या साऱ्या मनकामना पूर्ण होऊ देत" असं म्हणत देवळाचा पुजारी अन् भोवतीनं वेढलेल्या शिपायांच्या हातांवर चातुर्यानं व चलाखीनं त्यांनी तुरी दिली. सभास्थानी जाण्यापूर्वी सुमारे चाळीस मिनिटं त्या बसस्टॅंडवर उभ्या होत्या. त्यांना शोधून देणाऱ्यास सरकारनं पांच हजार रुपयांचं पारितोषिक देऊ केलं होतं. पण पोर्तुगीज सरकार अखेरीस हरलं. फटफजिती त्याच्या वाट्यास आली. पण सुधाताई सापडल्या नाहीत त्या नाहीतच. उत्तम कोकणी त्या सफाईदार रीतीनं बोलू शकतात. त्यामुळे मी चैत्रीच्या जत्रेला जाणारी भाविक बाई आहे या व अशा त्यांच्या अनेक क्लुप्त्या पोर्तुगीज शिपायांना ओळखताच आल्या नाहीत. म्हापशात अधिवेशनात जलदीनं आपलं भाषण वाचून हिंदी ध्वजाचा जयजयकार करुन त्यांनी ठरावाच्या शेकडो प्रती त्वरेनं सर्वत्र

वाटून टाकल्या. डोळ्याचं पातं लवतं न लवतं इतक्या अल्पावधीत हे काय घडतंय आपल्यासमोर हे न कळून पोर्तुगीजांचा कोण जळफळाट झाला. केवढं अकांडतांडव केलं त्यांनी! पण सुधाताई काय त्याला दाद देतात ?

पोलिसांनी अटक करतांच ठीक आहे चला, असं म्हणून शांतपणानं व हसतमुखानं त्यांच्याबरोबर चालायला सुरुवात! जणू चैत्रातल्या हळदीकुंकवासाठीच त्या निघाल्या आहेत. या तऱ्हेच्या विविध चित्त थरारुन टाकणाऱ्या हकिकती जेव्हा त्या सांगू लागल्या, तेव्हा माझ्या मनात एक कल्पना आली, "खरंच शिवाजीराजांच्या कारकीर्दीत सुधाताई जन्माला येत्या तर आपल्या असामान्य सत्वधैर्यानं, पराक्रमानं व निष्कलंक चारित्र्यानं त्यांनी महाराजांकडून केवढी वाहवा मिळवली असती नाही? शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दानं ऐकावा असं शाहीर कवी म्हणतात ते काय खोटं आहे?" "सुधा उठावास सुधाच झाली। उठाव गोवागत थंड झाला। सुधागुणे प्राण तयात आला-" असा त्यांच्या त्यागाचा सेनापती बापटांनी केलेला गौरव अस्थानी का आहे?

सुधाताईंबरोबर गोव्याच्या लढ्यातील निरनिराळ्या गोष्टी बोलण्या-सवरण्यात येणारी मंडळी तेव्हाच दंग होऊन जात. "युध्दस्य कथा रम्या" असं वचन आहे ना? या गोष्टी चालू असतानाच मधूनच त्या माडीवरुन खाली जात, "यदुराजा, दळण नेऊन टाकतोस एवढं गिरणीत? अन् आजीला नारळ दिलास का फोडून स्वयंपाकाला?" असं विचारीत. हातात कडव्या वालांनी भरलेलं ताट घेऊन जिना चढून वर येत व कुशल सुगरणीप्रमाणं दोन्ही हातांनी वाल सोलू लागत. "आमच्या ह्यांना, आमच्या भाईंना, भारी आवडते हो ही बिरड्यांची उसळ, म्हणून मुद्दाम करणार आहे आज. चार वर्षे सुटी होती ना माझ्या प्रपंचाच्या शाळेला! आता कामावर रुजू होताच अरिअर्समधलं काम नको का संपवायला?" असं विचारुन गालातल्या गालात मिस्किलपणे हसत आणि येणाऱ्या कुटुंबियांशी "लताचं लग्न ठरलं?, बाळ परीक्षा पास झाला; आता इंजिनियरिंगला जाणार का?" असल्या चौकश्या करीत त्या बोलू लागत.

"सुधाताई चार वर्ष तुरुंगात वेळ घालवण्याचं काय साधन काढलंत ते सांगायला विसरलातच की मघाशी" मी त्यांना आठवण करुन देत म्हटलं. त्यावर "अहो गेले दोन चार दिवस येणारे जाणारे कुतूहलानं हाच प्रश्न विचारतात. त्याचं उत्तर असं की प्रथम एक वर्ष एक महिना आम्हाला त्यांनी पणजीच्या तुरुंगात-पिंजऱ्यात ठेवलं. कस्टडीला पिंजरा म्हणतात हं तिकडं. तिथं आम्ही केला सत्याग्रह! तेव्हा केप्याच्या तुरुंगात त्यांनी आमच्या काहीजणींची बदली केली. ती जागा मात्र खरोखरच नयनमनोहर होती हं, मालूताई. पाठीमागं भव्य डोंगरराजी, त्यातून खळखळ खळखळणारं मधूर पाणी, आंबे-काजू-फणस-केळी यांच्या झाडांची लयलूट. ती पाहिली की एखाद्या आश्रमात असल्यासारखं वाटे मनाला. निवान्त, शांत! सरकार दररोज अगदी मोजके पैसे देई त्यातच स्वयंपाक करुन भागवावं लागे सारं आम्हांला. रात्री तर मी पुष्कळदा ताक, दूध किंवा आंबा, केळं असं एखादं पेय व फळ घेऊनच रहात असे. सकाळचा वेळ आपली आन्हिकं आटोपण्यात जाई. मग स्वयंपाक, गंमतीजंमतीचे मेनु करीत असू आम्ही."

"‘स्वयंपाक करताना मध्ये स्टूलावर पाठांतराची वही ठेवावयाची अन् येता जाता खूप आर्या, ओव्या, पदं, श्लोक पाठ करीत बसायचं. पोर्तुगीज सरकारचे आभारच मानायला हवेत त्यांनी मला निवांतपणे वाचनलेखन करण्याची संधी दिली त्याबद्दल. इंग्रजी मोडकं तुटकं मला येत होतं ते डिक्शनरीच्या साह्यानं मी वाढवण्याचा कसोशीनं प्रयत्न केला. मुलांना मधून मधून इंग्रजीत रटफ करीत पत्रंही लिहिली. ती पाहिलीत तर करमणूकच व्हायची तुमची पोटभर. अक्षर सुधारण्यासाठी जाड जाड बाऊंड बुकं घेऊन इंग्रजी मराठी शुध्दलेखन लिहिलं. मोरोपंतकृत आर्या भारत संपूर्ण वाचलं. बायबल, एकनाथी भागवत, जगाचा इतिहास वगैरेचं वाचन पुरं केलं. वाचनानं मन ताजं राही. दुपारी शिवणटिपण, निबंधलेखन स्पर्धा, हिंदीचा वर्ग, पत्रलेखन या व्यापात दिवस जाई. रात्र झाली की झोप. या दिनक्रमात वेळ कसा गेला तेच कळलं नाही. पहिले काही दिवस तर सत्याग्रहीचे जथेच्या जथे तुरुंगात येत असत ना, ते येता जाता दिसावेत म्हणून मुलींनी आरसा अडकवला होता खोलीत. त्यामुळे आपल्या सुहृदांच्या भेटीचा आनंद मिळे. अधून मधून आई, बहीण इत्यादी कुटुंबीय मंडळी भेटून जात. ह्यांच्यावर तेवढं सरकारी वॉरंट असल्यानं त्या भेटीचा सुयोग कधी लाभलाच नाही.

"माझ्या बरोबरच्या पोरी खूप दंगा करायच्या खेळायच्या, फुगडी झिम्मासुध्दा नाचायच्या अन् पोर्तुगीज सरकारवरचा क्रोध अनावर झाला म्हणजे तू नाहीतर तुझा काका या न्यायानं निदान इथल्या दरवानाला तरी आपण सहकार्य द्यायचं नाही असं ठरवून तास तासभर कधी कधी गमतीनं स्नान करीत बसायच्या. यांची स्नानं उरकल्याशिवाय कोठड्यांना, कुलूप लावून तो बिचारा जाणार कसा? मग मीच म्हटलं, त्याला का पिडता उगीच? तो बिचारा हुकमाचा ताबेदार! त्याला पीडा देऊन गोवा थोडाच स्वतंत्र होईल? मुलींना ते पटे व प्रेमानं त्या आपला पहिला हट्ट सोडत." सुधाताईंवर त्यांच्या या सहकारी विध्यार्थिनींची फार भक्ती होती हं. कच्ची कैरी कुठून तोडून आणली त्यांनी तरी ताईंच्या सल्ल्यानंच त्या तिची व्यवस्था लावीत. सुधाताईंचा या कन्यांना जसा आधार तसाच वचकहि वाटे. पोर्तुगीज पोलीस अधिकारीही त्यांना वचकून असत. त्यांची देशभक्ती अस्सल जातीची आहे हे त्यांनी केव्हाच ओळखलं असावं. तरीही त्यांचं नैतिक धैर्य खचावं म्हणून प्रथम परकीय राज्यकर्ते कारस्थानं करीत. उदाहरणार्थ, गोवा नॅशनल कॉंग्रेसच्या अध्यक्ष म्हणून पोर्तुगीजांविरुध्द बंड केल्याचा आरोप त्यांच्यावर केल्यावर सरकारी वकील लष्करी कोर्टात खटला चालू असताना त्यांना म्हणाला, "बाई, कशाला वर्षानुवर्षे खितपत पडतेस तुरुंगात? टाक माफी मागून म्हणजे संपलं. मुलंबाळं, कच्चीबच्ची यांचा काही विचार?" त्यावर सुधाताईंनी क्षणाचाही विलंब न लावता रोखठोक सडेतोड उत्तर त्याला दिलं, "संसारधर्मापेक्षा देशधर्म श्रेष्ठ आहे. तू तर पोटाची खळगी भरण्यासाठी पोर्तुगालहून मुलाबाळांना सोडून इथं आलास ना? मी निदान तसल्या कर्मासाठी तरी आले नाही. आणि समज, तुम्ही केलेल्या हालांनी मला मरण आलं तर माझ्या मुलांचे वडिल आहेत चांगले समर्थ त्यांना लहानाचे मोठे करायला. समजलं ना? "

ज्या निर्भय वृत्तीनं आणि निष्ठेने त्यांनी आपल्या तिरंगी झेंड्याचं रक्षण केलं तो अद्भुत प्रसंग तुला ठाऊक आहेच. हा कडवेपणाचा आणि कठोर निग्रहाचा वारसा त्यांनी त्यांच्या आईकडून घेतल्याचं त्यांची बहीण जयाताई मला सांगत होत्या. तुरुंगातल्या त्यांच्या या तरुण मैत्रिणी कधीमधी आजारी पडायच्या गं. सुधाताई त्यांची प्रेमानं सेवाशुश्रूषा करुन त्यांना धीर देऊन त्यांची मनं रिझवीत. 'फ्लू' चा हल्ला तिकडेही आला होता. त्या संदर्भात एका पत्रात त्यांनी लिहिलं होतं - 'मी अजून ठणठणीत आहे. ताप बहुधा माझ्याजवळ यायला भीत असावा किंवा या अतिथीला माझ्याकडून आतिथ्य घ्यायला आवडत नसावे. मित्रा काकोडकरने तापात एकदा हाक मारुन म्हटले, "ताई, एखादी कविता म्हण ना?" मी तिला, "मातीवर चढणे एक नवा थर अंती" ही कुसुमाग्रजांची कविता म्हणून दाखविली. मग तिच्या सांगण्यावरुन ताटीचे अभंगही म्हटले. मी अलीकडे जी कविता चांगली वाटेल ती पाठ करायचा सपाटा लावला आहे. या काव्यामधुच्या सहचर्यांत मी मला अगदी विसरुन जाते..." हे उद्‍गार वाचले की वाटतं शास्त्रीबुवांनाच काही एकट्याला पहिला नंबर नको द्यायला गुणवान् अन् रसाळ साहित्य-निर्मितीबद्दल! रसिकता, कोमलता किंवा मृदुभावनापरिपोषांत ही त्यांची सहचारिणीही तशीच कुशल आहे.

अगं, एकदा काय मजा झाली, सगळीकडे एकच बातमी उठली, "सुधाताई जोशींची गोवे तुरुंगातून मुक्तता!" मग काय, कोणी अग्रलेख लिहिले, कोणी शास्त्रीबुवांनाच अभिनंदनाच्या तारा केल्या- सगळीकडे एकच धमाल उसळली. ही बातमी तिकडे गोव्यात सुधाताईंनाही कळली तेव्हा त्यांनी विनोदानं लिहिलं- "आपल्या बाबतीत मला आश्चर्य वाटतं ते म्हणजे सगळ्या गोष्टी कशा अघटित घडतात. इतर लोक सुटल्यावर ते सुटल्याचं प्रसिध्द होतं; पण आपल्या बाबतीत आधी सुटल्याची प्रसिध्दी, अभिनंदन आणि मग मुक्तता! इकडे तर काही लोकांनी म्हणे माझं भाषणसुध्दा रेडिओवर ऐकलं! आहे की नाही गंमत!"

जीवनातल्या विविध चढउतारांकडे, हर्षविषादांच्या प्रसंगांकडे इतक्या खेळाडूपणानं तर कधी कमालीच्या स्थितप्रज्ञ वृत्तीनं पाहणाऱ्या कणखर सुधाताई प्रसंगी भावनांच्या उर्मीत कशा विरघळून, वितळून जातात ते बघ हं. शास्त्रीबुवांना लिहिलेल्या एका पत्रांत त्या म्हणतात - "मी अधिक महिना असल्यानं पंचामृत सोडलं होतं.... चालू महिन्यात साखर खायची नाही म्हणून नुसती दूध घालून कॉफी घेते.. आज जुन्या पंचांगातला शेवटचा सोमवार. देवासाठी जाई आणल्या होत्या. श्री ज्ञानेश्र्वर माऊलीला घातल्या. मुलींनी माळल्या. मुली इकडे तिकडे फिरताना त्या फुलांचा वास सारखा दरवळत होता. माझा मात्र हात तर राहोच पण मनसुध्दा त्या

फुलांकडे फिरकलं नाही. त्यानं तुमच्याकडे धाव घेतली. मला लहानपणापासून फुलं अगदी जीवाआगळी आवडतात पण इथं आल्यापासून माझी त्यांच्यावरची वासनाच उडाली आहे. त्यांची जवळीक मला सुखद वाटत नाही."

एखाद्या कुरुप, मधुर, भावपूर्ण विरहगीताची कोमलता अन् सुकुमारता यात किती काठोकाठ भरुन राहिली आहे नाही? स्त्री हृदयाच्या अनेक नाजुक भावनांची हळुवार हातानं काढलेली ही चित्रं किती हृदयस्पर्शी आहेत! बाहेर टिपूर चांदणं पडलेलं असावं, कुठूनतरी दूर अंतरावरुन भैरवीचे करुणार्त स्वर कोणीतरी छेडीत असावं, अन् एकाकी असा एखादा पांथस्थ समुद्रकाठी विषण्ण, उदास मनानं बसलेला असावा तसं वाटलं मला. यांतूनच प्रकट होणारी हिंदु स्त्रीची भक्ती, श्रध्दा अन् चिंतनशीलता, तिचं सौंदर्य वा सामर्थ्य शब्दांनी नाही उलगडून दाखवण्याजोगं.

काल रात्री त्यांचा निरोप घेण्यापूर्वी मी त्यांना सहज म्हटलं, "तुमच्या मुक्ततेची काही पूर्व कल्पना होती तुम्हाला? त्यात सरकारचा काय हेतु असेल? सरकारचं काय धोरण राहील पोर्तुगीज राजवटीबद्दल?" त्यावर सुधाताईंनी सांगितलं, "माझ्या मुक्ततेची तर मला काडीमात्र कल्पना नव्हती. जेलरनंच येऊन सांगितलं खोलीत - आज दुपारपासून मुक्त आहात तुम्ही. माझा कानावर विश्वासच बसेना. आनंद तर अतिशय झाला पण बरोबरीच्या माझ्या कन्यका मात्र मागं रहायच्या या जाणीवेनं तो आनंद गढूळला. पण तसं बाहेर न दिसू देता मी, माझ्या कन्यका, जेलर, असिस्टंट जेलर, आमचे काही नोकर यांना बोलावून आईस्क्रीमची पार्टी दिली. का ते आहे का ठाऊक? अहो, त्यांनी इकडे १३ मे लाच यदूची मुंज उरकून घेतली होती. त्या मुंजीच्या मेजवानीला ही सारी आमची चार वर्षांच्या सहवासानं शेजारी बनलेली मंडळी मुकली नव्हती का? तेव्हा टाकली देऊन त्यांना फीस्ट! आम्ही केप्याच्या तुरुंगात व नंतर तीन वर्षे मडगावच्या तुरुंगात असातानाही जेल पहायला, किंवा आम्हाला भेटायसवरायला कोणी मंडळी आली ना, तर चहापाणी करीत असू हो त्यांना. कधी भजी तर कधी चिवडा असायचा मदतीला. बोलूनचालून सारेच अतिथी. त्यांना विन्मुख पाठवणे हा धर्म आहे का आपला ? सांगा तुम्हीच!"

त्यांच्या मिस्किल बोलण्याला उद्देशून मी म्हटलं, "मग केप्याच्या आश्रमात महादेव शास्त्र्यांनाच बोलवायचं अतिथी म्हणून अन् द्यायचं खास सहधर्मचारिणीच्या हातचं सुग्रास भोजन. तेवढ्यानं हा ब्राह्मण तृप्त होऊन त्यानं आशीर्वाद नसता का दिला पोटभर?" त्यावर सुधाताई मनसोक्त हसल्या अन् लाजून गेल्या.

"आता गोव्याचं राजकारण, सरकारचं धोरण असल्या गोष्टींबद्दल बाकी काही विचारु नका हं. मी बोलूनचालून गृहिणी. राजकारणी स्त्री नव्हे की तसं होण्याची मला लवमात्र इच्छाही नाही. मी चुलीपासून निघाले तिथंच पुन्हा आले. तोच माझ्या जीवनांतील आनंदाचा ठेवा आहे. गोव्याच्या लढ्याबद्दल मला तीव्रतेनं तळमळ वाटत होती म्हणून मला देशाची हाक येताच राहवलं नाही व मी गेले. माझं काम मी केलं. तुरुंगातून मुक्त झाल्यावर दोन दिवस गोव्यातच राहून कुटुंबीय मंडळींना भेटण्याची इच्छा मला होती. म्हणून अधिकाऱ्यांकडे चौकशीला गेल्यावर त्यांनी मला विचारलं, "काय मिसेस जोशी, पुन्हा येणार का गोव्याला?" मी म्हटलं, "जरुर भासली तर का नाही येणार? अवश्य येईन."

"गोव्याच्या राजकारणाबद्दल मला जास्त काही जरी बोलता आलं नाही तरी पोर्तुगीजांनी आज फिरंगीकरणाचा प्रयत्न सर्वत्र चालवला आहे, त्यामुळे स्वातंत्र्य व संस्कृती या दोघांनाही मुकण्याचा प्रसंग आला आहे. या प्रश्नाकडे सरकारनं लक्ष देणं आवश्यक आहे असं मला वाटतं. सत्याग्रह ही वस्तूच अशी आहे की ती कधीही अयशस्वी होणार नाही. ती चीज काय आहे हे पोर्तुगीज सरकारलाही आता कळलं आहे, असं मला वाटतं. मला त्यापेक्षा त्यांत काही कळत नाही, अन् मी त्याचा विचारही केला नाही. राजकारण हे माझं ध्येय नव्हे नि त्यासाठी मी गोव्याच्या लढ्यात गेलेही नव्हते. माझं घर, माझा संसार, माझी चूल हीच माझी जुनी जीवाभावाची सवंगडी मंडळी; त्यात पुन्हा मी पूर्ववत् मिसळून जाणार!"

त्यांची ही निःस्पृह व निरिच्छ वृत्ती पाहून मला वाटलं सुधाताईंनी हिंदुस्थानात एक नवाच आदर्श घालून दिला आहे कार्याचा. आपल्याकडे सामान्यतः पुरुष हा राजकारणाकडे किर्ती, धन, मान, सत्ता ही भरपूर मिळविण्याचं एक प्रभावी साधन म्हणून पाहतो. कित्येकांचा तर तो धंदाही बनतो. अन् मग धंदेवाईक अशा अनेक लटपटी, खटपटी त्यात करण्याचा मनुष्याला पुष्कळदा मोहही होतो. राजकारणांत पडू इच्छिणाऱ्या व तेच आपलं क्षेत्र बनवू पाहणाऱ्या कित्येक स्त्रिया याचाच कित्ता गिरवितात. पण सुधाताई या साऱ्यांतून खऱ्या अलिप्त आहेत. "संसारी असावे। असोनि नसावे।" अशी त्यांची वृत्ती आहे. देशावर काही संकट येताच ही मध्यम वर्गीय महाराष्ट्रीय स्त्री-एका साध्या कुटुंबातील, प्रापंचिक, मुलाबाळांच्या-पतीच्या व्यापात गुरफटलेली स्त्री - आपले मायेचे, प्रेमाचे सारे पाश निग्रहानं, संयमानं दूर ठेवून देशकार्यासाठी निधड्या छातीनं बाहेर पडली. एका पाशवी सत्तेशी झुंज खेळायला सिध्द झाली. ते कार्य तिनं इतक्या एकाग्र चित्तानं केलं की भोवतालच्या जगाचा जणू तिला विसरच पडला. आपलं हे काम संपलं असं वाटताच आपल्या मर्यादा ओळखून पुन्हा आपल्या पूर्वीच्या जबाबदाऱ्या तिनं (मध्यंतरीच्या काळात विशेष काही आपण केलं असं क्षणभर मनातदेखील न आणता) आपल्या शिरावर परत घेतल्या. राष्ट्राच्या हाकेला 'ओ' देणाऱ्या सुधाताई सैनिक आहेत. देशाला मिळालेल्या स्वातंत्र्याचा सदुपयोग करतानाही सैनिकाचीच वृत्ती कार्यकर्त्यांनी बाळगायला हवी. सुधाताईंच्या रुपानं महाराष्ट्रीय स्त्रीनं त्याचा आदर्श घालून दिला आहे, यांत शंकाच नाही.

"माझं घर, माझा संसार हीच माझी खरी सवंगडी" हे त्यांचे उद्गार ऐकताच मला इसापनीतीतल्या लाकूडतोड्याची गोष्ट आठवली. त्याची स्वतःची आवडती लोखंडी कुऱ्हाड नदीत पडताच तो खिन्न झाला. देवाचा धावा त्याने करताच देव प्रसन्न झाला व "ही घे तुझी सोन्याची कुऱ्हाड, ही घे तुझी रत्नजडीत कुऱ्हाड" म्हणून अनेक कुऱ्हाडी देऊ लागला. त्यावर "देवा, नाथा, या माझ्या नव्हेत, माझी गरिबाची लोखंडी कुऱ्हाडच खरी माझी! ती मला द्या" असं त्यानं उत्तर दिलं. ही त्याची निर्लोभी व निःस्पृह प्रामाणिक वृत्ती अन् सुधाताईंची वृत्ती यांत काय फरक आहे? एवढा अपूर्व स्वार्थत्याग, अतुल साहस अन् अवर्णनीय पराक्रम त्यांनी केला आहे व त्यायोगे जगाला एक नवाच अपूर्व प्रयोग करुन आव्हान दिलं आहे की जगाच्या इतिहासात त्याला क्वचितच तोड सापडेल. मंत्रीपदाचे गव्हर्नरपदाचे (तथाकथित) मुकुट आजच्या राजवटीत त्यांच्या पायाशी लोळत येऊन पडतील, पण सुधाताई त्या सर्वांबद्दल खऱ्या अर्थाने उदासीन, संपूर्ण विरक्त आणि निरिच्छ आहेत. त्यांना काही नको आहे इतक्या वृत्तपत्रात शेकडो अग्रलेख आले, फोटो आले त्यांचा गौरव करणारे, पण त्यांनी त्यातलं काही वाचलं पाहिलं असेल तर शपथ! "माझं घर हेच माझं विश्रांतिस्थान!" असं म्हणत यजमानांच्या खांद्याला खांदा लावून पुन्हा प्रपंचाची धुरा वहायला बाई सिध्द झाली. निस्पृह तृणं जगत् हेच खरं.

काल रात्री मला त्यांच्या घरुन परत यायला अकरा वाजून गेले. मी 'जाते, जाते' म्हणायची अन् पुन्हा काहीतरी विषयाचं सुत्र सुरु व्हायचं व गप्पा रंगायच्या. सुधाताई हातानं निवडणं-टिपणं-शिवणं काही करीत करीत बोलायच्या. काल आम्ही सकाळी दुकानात गेलो हं सुधाताईंना लुगडी आणायची होती म्हणून. मी त्यांना गंमतीनं म्हटलं, "चार वर्षांची लूट करुन घ्या अन् पुष्कळ बुडवा शास्त्रीबुवांना!" त्यावर त्या हसून म्हणतात, "मालूताई, मनी पोझिशन डॅम आहे तिकडं सध्या!" दुकानातून परत येताना "दुपारी गहू आणायला हवेत, उडदाची डाळही संपली आहे तीही आणायला सांगा" असं कायसं त्या बोलत होत्या. शास्त्रीबुवा मला म्हणतात, "बघितलत मालुताई, बायको आली रे आली की आणा आणा झालंच सुरु!'"त्यांच्याकडे कृतक कोपानं पहात सुधाताई म्हणतात - "इश्य! तुमचं आपलं काहीतरीच!"

नलिनी, या आठवड्यात या दांपत्याबरोबर माझा काळ फार सुखाचा गेला. इंद्रधनुष्याचे विविध सौंदर्यपूर्ण मनोहारी रंग पहाताना रसिकांचं मन कसं उचंबळून येतं ना, तसं माझं मन या तृप्त, सुखी, आतिथ्यशील दांपत्याचं सहजीवन पाहून उचंबळून येई. शास्त्रीबुवांच्या कथातील नायिका इतक्या सत्वगुणी का याचं कोडंही मला तिथंच उलगडलं सुधाताईंकडे पाहून! आणि मघाशी सांगितलेला त्या दांपत्याचा लटका रुसवाफुगवा व मुग्ध, संयत प्रीतीचा मनोहारी अविष्कार पाहून मी मनातल्या मनानांत कौतुकानं

हसलेही. रात्र बरीच झाली तेव्हा निरोप घ्यावा म्हणून मी उठले. रिक्षा आणायला मी व शास्त्रीबुवा निघालो तशा सुधाताई लगबगीनं येऊन म्हणतात, "अहो, तुमची तंबाखूची पुडी संपली आहे ना? आठवणीनं घेऊन या बर का येताना-"

रिक्षाचा टर्रटर्र आवाज माझ्या कानी येत होता, रस्त्यावर अगदी तुरळक रहदारी होती. बाहेर चांदणं पडलं होतं पण मी माझ्याच विचारांच्या तंद्रीत होते. सुधाताईंबद्दलच्या आदरानं माझं मन काठोकाठ भरुन गेलं होतं. निरहंकार व विनीत अन् पराक्रमसंपन्न असं त्याचं व्यक्तित्व पाहून वाटतं, भारतीय व पोर्तुगीज यांच्या कलहसागराच्या मंथनातून अवतरलेली ही लक्ष्मी तर नव्हे ना? की नावाप्रमाणेच त्यातून लाभलेली 'सुधेची ठेव' आहे? पण या विचारानं मन जेव्हा उत्फुल्ल होतं त्याच वेळी आमचं सरकार, आमची जनता, यांना अनेक देशभक्तांनी गोव्याच्या लढ्याप्रीत्यर्थ केलेलं आत्मबलिदान, स्वार्थत्याग याचं पुरेसं स्मरण आहे ना असाही खिन्न करुन टाकणारा विचार मनात वारंवार आल्यावाचून राहिला नाही.

रात्री अंथरुणावर अंग टाकतांना मी म्हणत होते, "सुधाताई, तुमच्या अपूर्व कार्याला, ध्येयवादाला, शौर्याला माझे शतशः प्रणाम आहेत. पण मला तुम्ही पूर्वी होतात अन् अजुनीही आहात तशाच सुगृहिणीच पुढंही रहावं असं वाटतंय. तशा तुम्ही मला हव्या आहात - असंच आपल्या प्रपंचाचं नंदनवन आपल्या हातानं, वागणुकीनं फुलविणाऱ्या हव्या आहात. शास्त्रीबुवांची 'ढाल' व 'सदाफुली' म्हणूनच तुम्ही रहावं असं मला वाटतं आहे. कीर्ती - मान - अधिकार यांच्या काटेरी मुकुटापेक्षा तुमच्या विनयाचा, शुचितेचा, निःस्पृहतेचा व खऱ्या देशप्रीतीचा अलंकारच तुम्हाला अधिक शोभतो. रावरंक सारेजण सदा सर्वकाळ त्यापुढं नमतात. इतिहास आपली मान त्यापुढं आदरानं लववितो. हाच मुकुट तुम्हाला अधिक शोभतो.

यदु-अशोकची आई, शास्त्रीबुवांची सुपत्नी, माझ्यासारख्या असंख्य अतिथींना कधी सुग्रास भोजन तर कधी स्वादिष्ट फणसपोळी, आंबे यांचा खास कोकणातला मेवा देणाऱ्या सामान्यातल्या असामान्य, अशा सुधाताईच तुम्ही सदैव रहा! तशा तुम्ही रहाल ना? त्या तुम्हाला माझे पुनः प्रणाम! त्या तुमचं सुस्वागतम्!

-नलिनी, तू परदेशी आहेस म्हणून सारा वृत्तान्त तुला सविस्तर लिहिला. आता थांबायलाच हवं, नाही? तुझं कुशल चिंतिते.

तुझी भाग्यवान
मालती